(२) तो, ताबडतोब अंमलात येईल.

**२. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४ ची सुधारणा.**—महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४ मधील, खंड (ण) मध्ये, " पाच सदस्य; " या मजकुरापूर्वी " एका महिला सदस्यासह " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. २००१ चा महा. ३.

**३. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.**—मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मधील पोट-कलम (१) मध्ये,—

(क) " पुढील सदस्यांचा समावेश असलेली " या मजकुराऐवजी " अध्यक्षपदीय व्यक्ती म्हणून मंडळाचा अध्यक्ष व पुढील सदस्य यांचा समावेश असलेली " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) मधील दुसऱ्या स्तंभात, " अध्यक्ष " या मजकुराऐवजी " सदस्य सचिव " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १८ ची सुधारणा.**—मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मधील खंड (क) मध्ये " आणि क्षार पड जमिनीची कामे " या मजकुराऐवजी " क्षार पड जमिनीची कामे आणि पूर संरक्षक भिंतीचे बांधकाम " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## निवेदन.

राज्यात जलसंधारणाचा विशेष कार्यक्रम राबविण्याकरिता महाराष्ट्र शासनाने, जून १९९२ मध्ये मंत्रालयात जलसंधारण विभाग स्थापन केला आहे.

२. केंद्र सरकारने स्वीकृत केलेल्या तांत्रिक मानकांनुसार, १९९५-१९९६ पासून राज्याच्या १४८ विभागांमध्ये अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, जनतेच्या सहभागाद्वारे, विशेषतः गावकऱ्यांच्या आणि अशासकीय संघटनांच्या सहभागाद्वारे, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची, त्याचप्रमाणे पडीत जमीन विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा धोरणात्मक निर्णयही घेण्यात आला आहे. हे सर्व घटक विचारात घेऊन, शासनाने, जून १९९६ मध्ये नियोजन प्रक्रियेत सुधारणा करून आणि प्रकल्पातील बाबींचा पुनर्विचार करून पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम पुनर्घटित केला आहे.

३. पूर्वोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शासनाने, २२ ऑगस्ट २००० रोजी प्रख्यापित केलेला सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ या अन्वये, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ स्थापन केले आहे. आता, उक्त अध्यादेशाचे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० (२००१ चा महा. ३) मध्ये रुपांतर करण्यात आले आहे.

४. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ विधेयक, २००० च्या संबंधातील विधानसभेतील चर्चेमध्ये, विधानसभेतील सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या काही सुधारणा, शासनाकडून स्वीकृत करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, स्वीकारलेल्या सुधारणांचा अंतर्भाव करण्यासाठी उक्त अधिनियमात यथोचित सुधारणा करणे आवश्यक आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० (२००१ चा महा. ३) या मध्ये सुधारणा करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली आहे. म्हणून, उपरोक्त प्रयोजनांसाठी हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**पी. सी. अलेक्झांडर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक ११ फेब्रुवारी २००१.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुरेश यादवाडकर,**
शासनाचे सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

